## प्रकरण चौथे

# कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीमधील राजकारण व राजकीय नेतृत्व

१) प्रास्ताविक

२) बाजार समितीमधील निवडणूका आणि राजकारण

३) समितीच्या विकासात राजकीय नेतृत्वाचे योगदान

## प्रास्ताविक :

उत्तम नेतृत्व हे कोणत्याही संघटनेच्या किंवा संस्थेच्या प्रगतीसाठी मार्गदर्शक ठरते. औद्योगिक, शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय प्रगतीसाठी योग्य नेतृत्व आवश्यक असते. खंबीर आणि अभ्यासू नेतृत्वावरच संस्थेच्या कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता, आत्मविश्वास अवलंबून असतो. संस्था, संघटनेचा विश्वास आणि दर्जा नेतृत्वावरून ओळखला जातो.

नेतृत्व म्हणजे नेते किंवा नेत्यांच्याद्वारे उपलब्ध करून दिलेले असे साधन की ज्याद्वारे संस्थेची आर्थिक तत्त्वे, उद्दिष्ट्ये, विचारधारा, मनोधैर्य या सर्व घटकांचा संस्थेच्या उद्देशपूर्तीसाठी यथायोग्यपणे उपयोग करून घेतला जातो.

अलीकडच्या काळात राजकारणात नेतृत्वाचा उदय हा सर्वसाधारणपणे सर्व प्रकारच्या निवडणूकांतून होतो. सहकारी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था, विधानसभा, लोकसभा अशा निवडणूकांमध्ये पक्षीय व गटातटाचे राजकारण करून निवडणूक लढविली जाते. राजकारण म्हणजे सत्ताप्रभाव व प्रतिष्ठा यांच्यासाठी होणारे प्रयत्न होत. राजकारण ही राजकीय वर्तनाशी संबंधीत प्रक्रिया असून नेते, जनता यांचे वर्तनाचा राजकारणाशी संबंध येत राहतो. परंतु आपल्यासमोर सामान्यत: नेतृत्व म्हणजे केवळ राजकीय क्षेत्राशी संबंधीत व्यक्तिमत्त्व उभे राहते. राजकारण हे जनमाणसाला फार मोठ्या प्रमाणात प्रभावीपणे प्रेरित करीत असते. त्यामुळे राजकीय क्षेत्रातील नेतृत्वाचा जनतेवरील प्रभाव अधिक प्रमाणात दिसून येतो. परंतु इतर अनेक ठिकाणी नेतृत्वाची वेगवेगळी शक्तीस्थाने असतात. उदाहरणार्थ, संस्थेचा अध्यक्ष, संचालक, कार्यवाह, व्यवस्थापक अधिकारी, प्राचार्य इत्यादी अशा अनेक क्षेत्रात व्यक्ती नेतृत्व करीत असते असे नेतृत्व करीत असताना त्यात यशस्वी होण्यासाठी नेतृत्व गुण असण्याची किंवा ते विकसित करून घेण्याची नितांत आवश्यकता असते.

राजकीय नेतृत्वाच्या जडणघडणीत पक्षीय राजकारण, गटातटाचे राजकारण व तेथील सामाजीक, राजकीय व आर्थिक परिस्थिती याचा परिणाम दिसून येतो. कोल्हापूर जिल्ह्याच्या राजकारणावर व राजकीय नेतृत्वावर स्थानिक परिस्थितीचा प्रभाव आहे. राजर्षि शाहूंचा ऐतिहासिक वारसा येथे लाभलेला आहे. त्यांच्या नेतृत्व गुणांचा समाजातील राजकीय, सामाजिक व आर्थिक

क्षेत्रांवर आजही प्रभाव आहे. कोल्हापूर जिल्हा सधन आहे. येथील भौगोलिक परिस्थितीमुळे ऊस व इतर नगदी पिके मोठ्या प्रमाणावर घेतली जातात. येथे सहकारी संस्थांचे जाळे सर्वत्र पसरलेले आहे. सहकारी संस्थेतील सत्तेचा प्रभाव येथील स्थानिक व पक्षीय राजकारणावरती दिसून येतो. आजपर्यंतच्या राजकारणाचा विचार करता काँग्रेसच्या ध्येयधोरणांचा व विचारांचा प्रभाव येथील राजकारणावरती व राजकीय नेतृत्वावरती दिसून येतो. येथील निवडणूकीत पक्षीय राजकारणापेक्षा काँग्रेस अंतर्गत असलेल्या राजकीय गटांमध्येच संघर्ष झालेला आहे. लोकसभा, विधानसभा, स्थानिक स्वराज्य संस्था व मोठ्या सहकारी संस्थामध्ये काँग्रेस अंतर्गत सत्तेसाठी लढाई झालेली आहे. अलिकडच्या काळात काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस बरोबरच शिवसेना, शे.का.पक्ष व जनतादल यांनीही आपली राजकीय प्रभाव क्षेत्रे निर्माण केलेली आहेत. जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्था व इतर सहकारी संस्थावर काँग्रेस अंतर्गत गटातटाची सत्ता आहे. जिल्हा मध्यवर्ती बँक, दूध संघ, सहकारी साखर कारखाने व बाजार समित्या इ. महत्वाची सहकारी आर्थिक सत्ताकेंद्रे आजही काँग्रेस अंतर्गत नेतृत्वाच्या प्रभावाखाली आहेत. या संस्थामध्ये जिल्ह्यातील शेतकरी व सामान्य जनता यांचा आर्थिक आणि राजकीयदृष्टया संबंध येत असल्याने या सत्ताकेंद्रांचा लोकसभा व विधानसभेच्या निवडणूकांमध्ये प्रभाव जाणवतो. कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती ही याला अपवाद नाही. बाजार समितीवर जिल्ह्यातील राजकारणाचा प्रभाव जाणवतो येथील राजकीय सत्तेचा नेतेमंडळींना जिल्ह्याच्या इतर राजकारणात उपयोग होतो. कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीची स्थापना झाल्यापासून आजपर्यंतच्या निवडणूकांचा आढावा घेतल्यानंतर येथील राजकारण व नेतृत्व लक्षात येऊ शकते.

## बाजार समितीमधील निवडणूका आणि राजकारण :

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीची स्थापना १५ ऑक्टोबर १९४५ रोजी झाली. कोल्हापूर संस्थानाने 'दि कोल्हापूर ॲग्रीकल्चर प्रोड्यूस मर्केट कमिटीची' स्थापना करून तारीख २५ ऑक्टोबर १९४५ इ. रोजी ११ सभासदांची कमिटी नेमली या कमिटीस व्यापारी वर्गाकडून विरोध झाला. उभयपक्षी तडजोड होवून ता. २२ फेब्रुवारी १९४६ रोजी पहिल्या मार्केट कमिटीच्या १५

सभासदांची नियुक्ती करण्यात आली. मार्केट कमिटीचे पहिले चेअरमन म्हणून कोल्हापूर संस्थानचे अकौंटंट जनरल श्रीयुत नारायणराव गोपाळराव सरदेसाई यांची नियुक्ती झाली. नव्याने स्थापन झालेल्या बाजार समितीस त्यांच्या ज्ञानाचा चांगला उपयोग झाला. मार्केट कमिटीची अमृतवेल भास्करराव जाधव यांच्या हस्ते रोपन झाली आहे. मार्केट कमिटीची स्थापना करण्यात तत्कालीन डेव्हलपमेंट सेक्रेटरी श्री जे. पी. नाईक यांनीही हिरीरीने भाग घेतला होता. मार्केट कमिटीची सुरूवात झाल्यावर मार्केट कक्षातील सर्वांच्याच व्यवहारावर नियंत्रण आले. सप्टेंबर १९४६ ते डिसेंबर १९४८ या दोन वर्षाच्या काळामध्ये चेअरमन द.म. साळोंखे यांनी आपल्या अभ्यासू वृत्तीने अनेक प्रश्न मार्गी लावले.[१]

सरकार नियुक्त पहिल्या बाजार समितीच्या कार्यकारणीनंतर तारीख २३.११.१९४८ साली नवीन कार्यकारणी निवडून आली व त्यांनी चांगल्या प्रकारे कामकाज केले. त्यामध्ये शेतकरी प्रतिनिधी, व्यापारी प्रतिनिधी, स्थानिक स्वराज्य संस्था प्रतिनिधी, सरकारी प्रतिनिधी इत्यादींचा समावेश होता. या कार्यकारणीमधील श्री विश्वनाथ तुकाराम उर्फ व्ही.टी पाटील तसेच तात्यासाहेब मोहिते, दत्तोबा पाटील (टाकळीकर), आण्णासाहेब देसाई, एकनाथ पाटील(राशिवडेकर), शंकरराव देसाई,दत्तात्रय पाटील यांच्या चेअरमन पदाच्या कार्यकालात बाजार समितीची उभारणी झाली.[२]

कोल्हापूर शेतीउत्पन्न बाजार समितीची निवडणूक मे १९६१ मध्ये झाली.

**शेतीमाल बाजार समिती - निवडणूक मे १९६१ :**

शेतीमाल बाजार समितीच्या निवडणूकीसाठी दि. २५.०५.१९६१ रोजी मतदान झाले. मतदानाची वेळ स. ८ ते १२ व संध्याकाळी २ ते ६ अशी होती. मतदान अत्यंत चुरशीने झाले. तीन व्यापारी जागांसाठी ७ उमेदवार व ७ शेती जागांसाठी १६उमेदवार निवडणूकीला उभे होते. प्रारंभी एकूण ३५ उमेदवारांनी अर्ज भरले होते. त्यापैकी बऱ्याच जणांनी अर्ज मागे घेतले. निवडणूका करवीर प्रांत ऑफिसर यांच्या देखरेखीखाली झाल्या असून मतमोजणी दि. २९ मे १९६१ रोजी झाली. या निवडणूकीची मतमोजणी मामलेदार कचेरीत होवून ३ व्यापारी जागांचा निकाल दुपारी १ वाजता जाहीर करण्यात आला. (यशस्वी उमेदवार)- ठाकूर श्रीपाद गणेश २९५ मते, पोवार श्रीपतराव

तुकाराम-२८७ मते, परीख बाबूलाल मणिभाई- २५८ मते(पराभूत उमेदवार), गांधी बां. फ. -२१६ मते, दळवी वि.ग.-१४५ मते, भिवटे ध. अ. -१४४ मते, एकूण मतदार ६३७ , एकूण मतदान-४६४ मते, बाद मतपत्रिका-९.[३]

७ शेती जागांसाठी ५ तालुक्याम्ध्ये ४५ केंद्रावर मतदान झाले. तालुकानिहाय मतदान केंद्र पुढीलप्रमाणे होती. करवीर-१४, भुदरगड-१०, राधानगरी-७, पन्हाळा-११, शाहुवाडी-३ या गटातील मतमोजणी सलग दोन दिवस चालली. मतमोजणी सलग न होता पहिल्या दिवशी ऑफिस वेळेनंतर बंद झालेली मतमोजणी दुसऱ्या दिवशी १० वाजता पुढे चालू झाली. शेतकरी प्रतिनिधी गटातील विजयी उमेदवार व त्यांना पडलेली मते अशी होती -

१) मे. दादासाहेब दत्ताजीराव निंबाळकर-१०४८४

२) पिराजी विष्णू वारके - १०३५५

३) बाबूराव ज्ञानोबा देसाई - १०२४८

४) पांडूरंग दौलत पाटील - ६२०२

५) भाऊ हरी पोवार - ५७२५

६) शंकरराव कृष्णराव देसाई - ५२९८

७) पांडूरंग जोती पाटील - ५२५४[४]

शेतकरी प्रतिनिधी जागांसाठी उमेदवारांनी व्यक्तिगत स्वत:चा प्रचार केला होता. प्रत्येक मतदारास ७ मते देण्याचा अधिकार होता. मतदारास एकाच उमेदवाराच्या चिन्हापुढे ७ फुल्या मारून मतदान करता येत होते. त्यामुळे उमेदवारांनी आपली कामगिरी सांगून आपल्यालाच ७ मते द्यावीत असा प्रचार केला. या नवनियुक्त समितीची मुदत दिनांक २५.०५.१९६१ ते दिनांक ३०.०९.१९७१ अशी प्रदिर्घ होती. या कार्यकालामध्ये त्यांनी कायद्याची चोख अमंलबजावणी तसेच व्यापारी व समिती यांच्यात समन्वयासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. शेतकऱ्यांचे हित साधून श्रमजीवी वर्गामध्ये आर्थिक सुबत्ता निर्माण करण्यासाठी त्यांनी प्रामाणिकपणे व आपूलकीने काम केले. बाजारपेठेमध्ये अध्यावत सुखसोयी निर्माण करून पेठेची ख्याती वाढविण्याबरोबरच बाजारपेठ हे कोल्हापूरचे भूषण

ठरविले. या समितीचा कार्यकाल बाजारसमितीच्या इतिहासामध्ये भरभराटीचा म्हणून ओळखला जातो.

महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) अधिनियम, १९६३ चा कायदा व नियम, १९६७ या नवीन कायद्याची अंमलबजावणी झाल्यानंतर बाजार समितीची सार्वजनिक निवडणूक दिनांक ०५.०५.१९७१ इ. रोजी झाली. समितीचे सदस्य मंडळ दिनांक ०१.१०.१९७१ इ. रोजी अधिकार पदावर आले.

## कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती - निवडणूक मे - १९७१ :

बाजार समितीची ही निवडणूक सत्ताधारी नेते मा. श्रीपतरावजी बोंद्रे यांच्या नेतृत्वाखालील आघाडीने एकतर्फी जिंकली होती. विरोधी पॅनेलला फारसा प्रतिसाद मतदारांनी दिला नाही. याचाच अर्थ मा. श्रीपतरावजी बोंद्रे यांचा बाजार समितीच्या राजकारणातील प्रभाव वाढत गेला. नवीन सदस्यमंडळाने आपली तीन वर्षाची कारकीर्द यशस्वीपणे पूर्ण केली. त्यानंतर पुढील निवडणूका ऑगस्ट १९७४ मध्ये झाल्या.

## कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती - निवडणूक ऑगस्ट १९७४ :

कोल्हापूर कृषि उत्पन्न बाजार समितीच्या दिनांक २२.०८.१९७४ इ. रोजी झालेल्या निवडणूकीसाठी कार्यक्षेत्रातील नेतेमंडळींनी लोकशाही जनता आघाडी, किसान आघाडी, राष्ट्रीय शेतकरी आघाडी अशा तीन आघाड्या केल्या होत्या. त्यापैकी विजयी लोकशाही जनता आघाडीचे नेतृत्व श्रीपतराव बोंद्रे यांनी केले होते.

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीच्या नवीन मॅनेजिंग कमिटीच्या निवडणुकीमध्ये लोकशाही जनता आघाडीने विजय संपादन केला. या निवडणूकीचे निकाल पुढीलप्रमाणे जाहीर झाले-

ग्रामपंचायत मतदार संघ १) पांडूरंग भगवान राणे. आचिर्णे ता. गगनबावडा ९९२२ २) पिराजी विष्णू वारके, सरवडे ता. राधानगरी ३) बळवंत कृष्णाजी पाटील, सोनाळी, ता. करवीर १५२२हे सर्व लोकशाही जनता आघाडीचे उमेदवार आहेत.

सहकारी संस्था मतदार संघ - १) वसंतराव दत्तात्रय पाटील, सांगाव ता. कागल १७६० २) श्रीपतराव हरी चौगुले, सरूड ता, शाहूवाडी १६२७ ३) पांडूरंग ज्ञानू पाटील, आसगांव ता. पन्हाळा १९२० ४) तुकाराम गुंडू नाईक, पोखले ता. पन्हाळा, १४९२ ५) बाजीराव डकरे १५२५ ६) मारूतीराव खाडे १४९० ७) बाळासाहेब पाटील ४६२

व्यापारी मतदार संघातून १) पांडुरंग तुकाराम पाटील ३३४ २) बबन तुकाराम लोध ३२६ व बाबुभाई फकिरचंद गांधी २९६ हे विजयी झाले आहेत.

या निवडणुकीत लोकशाही जनता आघाडीचे आठ, किसान आघाडीचे दोन, याप्रमाणे प्रतिनिधी निवडून आले तर राष्ट्रीय शेतकरी आघाडी संपूर्णपणे पराभूत झाली. सदरची मतमोजणी २६ ऑगस्ट १९७४ रोजी झाली.[५]

बाजारसमितीत ऑगस्ट १९७४ च्या निवडणुकीनंतर दिनांक ७ ऑक्टोबर १९७४ इ. रोजी नवनिर्वाचित समिती अधिकारावर आली. प्रथम सभापती होण्याचा बहुमान श्री तुकाराम गुंडू नाईक (महाराज) यांना मिळाला. उपसभापती म्हणून व्यापारी प्रतिनिधी वसंतराव तुकाराम लोध यांची निवड झाली. विद्यमान समितीने दिनांक ७.१०.१९७४ ते १९.०१.१९८४ इ. रोजेपर्यंत आपली प्रदिर्घ कारकीर्द यशस्वी केली. श्री तुकाराम गुंडू नाईक यांनी प्रदिर्घ कारकीर्दीमध्ये दोनवेळा सभापती पद भुषविले त्याचबरोबर श्रीपतराव चौगुले व बी. के. पाटील (सोनाळीकर) यांनाही सभापती पद भुषविण्याचा मान मिळाला. सदर समितीची निवडणूक ऑगस्ट १९७४ पासून न झालेने दिनांक १७.०१.१९८४ रोजी महाराष्ट्र शासनाने बाजारसमितीचे संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासकाची नियुक्ती केली.[६]

## कोल्हापूर कृषि उत्पन्न बाजार समिती संचालक मंडळ बरखास्त व प्रशासक नेमणूक:

दिनांक १७ जानेवारी, १९८४ रोजी महाराष्ट्र शासनाने एका वटहुकूमाद्वारे राज्यातील ११ कृषि उत्पन्न बाजार समित्यांचे संचालक मंडळ बरखास्त करून प्रशासकाच्या नेमणूका केल्या या बाजार समित्या अनेक वर्षे निवडणुक न झालेल्या होत्या.

कोल्हापूर बाजार समितीच्या संचालक मंडळाची निवडणूक दिनांक २२.०८.१९७४ रोजी झाली होती. त्यानंतर निवडणूका न झाल्याने दि. १७.०१.१९८४ च्या आदेशाने समितीचे संचालक मंडळ बरखास्त करणेत आले व सहकार खात्याचे जिल्हा उपनिबंधक श्री बी. बी. शेळके यांची प्रशासक म्हणून नियुक्ती झाली व त्यांनी दिनांक १९.०१.१९८४ रोजी कामकाजाची प्रशासकीय सूत्रे हाती घेतली बाजार समितीमध्ये प्रशासकीय कारकीर्द दिनांक ०३.०६.१९८६ इ. रोजी संपली. तत्पूर्वी बाजार समितीची निवडणूक दिनांक २५.०३.१९८६ रोजी झाली.

## कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती - निवडणूक मार्च १९८६ :

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीची पंचवार्षिक निवडणूक दिनांक २५.०३.१९८६ इ. रोजी प्रामुख्याने दोन आघाड्यामध्ये चुरशीने लढविली गेली होती. या निवडणुकीत १४ जागासाठी ६० उमेदवार रिंगणात होते. राजर्षि शाहू शेतकरी आघाडी व शेतकरी सेवा आघाडी या दोन आघाड्यामध्ये ही निवडणूक झाली. जिल्ह्यातील दोन्ही खासदार सर्व आमदार त्याचप्रमाणे सर्व राजकीय नेते मंडळींनी या निवडणुकीत सक्रीय सहभाग घेतला होता.[७]

राजर्षि शाहू शेतकरी आघाडीचे नेतृत्व खासदार उदयसिंगराव गायकवाड, खासदार बाळासाहेब माने, आमदार श्रीपतरावजी बोंद्रे यांनी केले. आमदार बाबूराव धारवाडे, आमदार दिग्विजय खानविलकर, आमदार यशवंत एकनाथ पाटील, आमदार संजयसिंह गायकवाड, आमदार दिनकरराव जाधव, माजी आमदार विक्रमसिंह घाटगे यांच्यासह जिल्हा बँकेतील काही संचालकांचा, जिल्हा दूध संघाच्या संचालकांचा, जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या पदाधिकाऱ्यांचा भक्कम पाठींबा होता. त्याविरोधात उभ्या असलेल्या शेतकरी सेवा आघाडीला विरोधी पक्षाच्या चार

आमदारांचा व एका माजी आमदारांचा पाठींबा होता. जिल्हा कॉंग्रेस(एस.) चे अध्यक्ष बाबा कुपेकर व या पक्षाचे दोन आमदार श्री बजरंग देसाई व श्री सदाशिवराव मंडलीक यांचे पाठबळ शेतकरी सेवा आघाडीला होते. तर याच पक्षाचे प्रदेश सरचिटणीस एच. डी. पाटील, शहर अध्यक्ष बाबूराव पारखे व जिल्हा युवक कॉंग्रेस (एस.) चे अध्यक्ष राम फाळके यांचा पाठींबा राजर्षी शाहू शेतकरी आघाडीला होता. त्याचप्रमाणे कॉंग्रेस ( आय) चे माजी आमदार बाबासाहेब पाटील सरूडकर यांचा पाठींबा, सर्व कॉंग्रेस(आय) ची नेते मंडळी राजर्षी शाहू शेतकरी आघाडीच्या बाजूने असतानाही त्या विरोधात शेतकरी सेवा आघाडीला होता. त्याप्रमाणे कॉंग्रेस (आय) मधील एक ज्येष्ठ कार्यकर्ते मारूती खाडे या पॅनेलचे उमेदवार होते. या निवडणुकीमध्ये जिल्ह्यातील नेतेमंडळींनी आपल्या नेतृत्वाखाली व पाठींब्यावर आपल्या कार्यकर्त्यांना निवडणूक रिंगणात उतरविले होते. या निवडणूकीत राजकीय चूरस दिसून आली.

बाजार समितीच्या निवडणूकीत माजी मंत्री बोंद्रे व खासदार गायकवाड गटाच्या राजर्षि शाहू शेतकरी आघाडीने स्पष्ट बहूमत मिळविले. विरोधी गटातील फक्त श्री मारूतीराव खाडे सहकारी संस्था मतदार संघातून विजयी झाले.

ग्रामपंचायत मतदारसंघातून निवडून द्यावयाच्या तीन जागांसाठी दोन आघाडीत लढत झाली. राधानगरी व गगनबावडा तालुका वगळता इतर सर्व कार्यक्षेत्रात राजर्षी शाहू आघाडीला मताधिक्य मिळाले. या आघाडीचे श्री गजाननराव ठोंबरे(पन्हाळा), श्री बाबासाहेब पाटील (भूयेकर) करवीर, व श्री निवृत्ती दळवी (शाहूवाडी) हे उमेदवार विजयी झाले.

सहकारी संस्था मतदार संघातील सात जागांसाठी ही चुरशीने लढत झाली. बोंद्रे गायकवाड गटाच्या राजर्षी शाहू शेतकरी आघाडीचे प्रमुख सहा उमेदवार विजयी झाले व शेतकरी सेवा आघाडीचे प्रमुख श्री मारूती खाडे हे एकमेव उमेदवार विरोधी आघाडीतून निवडून आले. विजयी उमेदवार पुढीलप्रमाणे - १) बाजीराव उर्फ हिंदुराव बळवंत डकरे, २) पी. डी. पाटील आसगावकर ३) मारूतीराव खाडे ४) श्रीपती हरी चौगुले ५) शामराव कासार ६) बी. के. पाटील सोनाळीकर ७) बंडोपंत पाटील.

व्यापारी सहकारी संस्थातून निवडून द्यावयाच्या एका जागेसाठी दोन उमेदवार उभे होते. त्यापैकी श्री विश्वास नेजदार यांनी माघार घेवून श्री बापूसाहेब वळके यांना पाठींबा दिला होता. त्यामुळे ते विजयी झाले. त्याचप्रमाणे व्यापारी मतदार संघातील तीन जागासाठी झालेल्या चुरशीच्या लढतीत नगरसेवक पी. टी. पाटील, अरूण चौगुले व आण्णासाहेब कुसाळे विजयी झाले.[८]

बाजार समितीच्या निवडणूकीत बोंद्रे, गायकवाड गटाने आपले वर्चस्व सिध्द केले. दिनांक ०४.०६.१९८६ इ. रोजी श्री बाबासाहेब ज्ञानू पाटील (भुयेकर) यांची चेअरमनपदी निवड झाली ते श्री श्रीपतराव बोंद्रे यांचे कार्यकर्ते होते. बाजारसमितीच्या निवडणूकीत कॉंग्रेस (आय) च्या नेतेमंडळींच्या आघाडीच्या विरोधात कॉंग्रेस (एस) च्या नेतेमंडळींनी पाठींबा दिलेले पॅनेल उभे असले तरी कॉंग्रेस (एस) ची काही नेतेमंडळी राजर्षी शाहू शेतकरी आघाडीबरोबर होती त्याचप्रमाणे कॉंग्रेस (आय) चे एक माजी आमदार विरोधी आघाडीबरोबर होते. तसेच कॉंग्रेस (आय) चे ज्येष्ठ कार्यकर्ते श्री मारूती खाडे हे विरोधी पॅनेलमधून निवडणूक लढवून विजयी झाले. एकंदरीत जिल्ह्यातील सर्वच नेतेमंडळींनी या निवडणूकीत सक्रीय सहभाग घेतला होता. या नवनिर्वाचित समिती सदस्यामधील श्री बाबसाहेब पाटील (भूयेकर) व श्री बंडोपंत पाटील (म्हाकवेकर) यांना संपूर्ण कारकिर्दीत सभापतीपदाचा मान मिळाला.

## कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती - निवडणूक डिसेंबर १९९१ :

बाजार समितीची पंचवार्षिक निवडणूक दिनांक ०४.१२.१९९१ रोजी सत्तारूढ राजर्षी शाहू शेतकरी आघाडी व विरोधी सहकार आघाडी यांच्यामध्ये झाली मार्च १९८६ च्या निवडणुकीप्रमाणे ही निवडणूक चुरशीची झाली नाही. राजर्षि शाहू शेतकरी आघाडी ही सत्ताधारी आघाडी होती.मार्च १९८६ च्या निवडणुकीत बोंद्रे, गायकवाड या गटातील नेतेमंडळींनी पुन्हा एकत्र येऊन ही आघाडी केली होती. कार्यक्षेत्रातील कॉंग्रेस (आय) च्या नेतेमंडळींचा या आघाडीला पाठींबा होता. विरोधी सहकार पॅनेलला हमाल तोलाईदार गटातील एक जागा मिळाली. सत्ताधारी राजर्षि शाहू आघाडीला निर्विवाद बहूमत मिळाले. एक जागा बिनविरोध जिंकल्यानंतर लढविलेल्या १० ही जागांवर या गटाचे

उमेदवार मोठ्या मताधिक्याने विजयी झाले. या निवडणुकीमध्ये राजकीय चुरस फारशी दिसली नाही. आमदार श्रीपतराव बोंद्रे यांची गेली २० वर्षे बाजार समितीवर असलेली सत्ता कायम राहीली.[९]

विजयी उमेदवारात सर्वश्री शामराव कासार, बी. के. पाटील, बाबसाहेब पाटील(भूयेकर), बंडोपंत पाटील, निवृत्ती दळवी, बापूसाहेब वळके, व अरूण चौगुले हे विद्यमान संचालक पुन्हा निवडून आले. त्याचप्रमाणे वि.रा.भास्कर, सतीश पाटील, दत्ता पाटील, पी. आर. देसाई, शंकरराव चौगुले, शशिकांत नष्टे, व सहदेव पाटील हे नवे संचालक समितीवर निवडून आले होते. ही निवडणूक दोन आघाडीमध्ये लढविली गेली तरी त्यामध्ये राजकीय चुरस कमी होती. राजर्षि शाहू शेतकरी आघाडीने एकतर्फी विजय मिळविला. व्यापारी प्रतिनिधी म्हणून निवडून आलेले दोन उमेदवार कोणत्याच आघाडीतून उभे नव्हते. नूतन संचालक मंडळातून दिनांक १६.१२.१९९१ इ. रोजी श्री बाबासाहेब ज्ञानू पाटील (भूयेकर) यांना सभापती होण्याचा मान मिळाला. या पदाचा बहूमान त्यांना दूसऱ्यांदा मिळाला. व श्री श्रीपतराव बोंद्रे यांचे बाजार समितीवरील राजकीय वर्चस्व पुन्हा सिध्द झाले.

श्री बाबासाहेब पाटील (भूयेकर) यांची सभापतीपदाची ४ वर्षाची कारकीर्द झाल्यानंतर त्यांनी राजीनामा दिला. रिक्त जागेवर सभापती म्हणून श्री बंडोपंत पाटील (म्हाकवेकर) यांची एकमतानी निवड झाली. त्यांची निवड महादेवराव महाडीक यांच्या नेतृत्वाखाली झाली व समितीवरील श्री श्रीपतराव बोंद्रे यांची राजकीय सत्ता संपुष्टात येवून श्री महादेवराव महाडीक यांची बाजार समितीवर सत्ता स्थापन झाली.[१०]

## कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती - निवडणूक जानेवारी १९९७ :

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीची सार्वत्रिक निवडणूक दिनांक ०२.०१.१९९७ इ. रोजी झाली. या निवडणूकीत जिल्ह्याच्या राजकारणात कॉंग्रेस अंतर्गत नवी फेरजुळणी झाली होती. जिल्ह्याच्या राजकारणात सर्वेसर्वा होऊ पाहणाऱ्या महादेवराव महाडीक यांच्या नेतृत्वाखालील राजर्षि शाहू आघाडी विरूध्द गेली अनेक वर्षे बाजार समितीवर वर्चस्व असलेले जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते श्रीपतरावजी बोंद्रे व त्यांच्या अन्य सहकाऱ्यांचे श्री महालक्ष्मी शेतकरी सेवा पॅनेल अशी ही निवडणूक

झाली. काँग्रेस अंतर्गत गटांची राजकीय समीकरणे व ताकद या निवडणूकीतून स्पष्ट होणार असल्याने राजकीय चुरस शिगेला पोहचली होती. कोल्हापूर जिल्ह्यातील राजकीय वर्चस्वासाठी व काही गटांचे राजकीय भवितव्य या दृष्टीने बाजार समितीच्या निवडणुकीत खरी चुरस काँग्रेसच्याच दोन गटामध्ये झाली. जिल्ह्याच्या राजकारणावर आपला अंकूश कायम राखण्याचा प्रयत्न महादेवराव महाडीक यांच्याकडून होत असताना तशी सत्ता केंद्रित होवू नये यासाठी जिल्ह्यातील काही ज्येष्ठ नेते मंडळी विरोधातून प्रयत्नशील होती.

बाजार समितीच्या निवडणूकीत सर्वसाधारण सहकारी सेवा संस्था गटांतून ७ जागांसाठी २१ उमेदवार व ग्रामपंचायत गटातील सर्वसाधारण २ जागांसाठी १२ उमेदवार व राखीवमधील एका जागेसाठी चार उमेदवारांनी निवडणूक लढविली. निवडणूकीसाठी ७ तालुक्यात ८१ मतदान केंद्रावर मतदान झाले.ग्रामपंचायत गटातील मतदारसंख्या ५१८० व सहकारी सेवा संस्था गटातील मतदारांची संख्या ८०७३ इतकी होती. संस्था व ग्रामपंचायत या दोन्ही गटात करवीर तालुक्यातील मतदारांची संख्या जास्त असल्याने या तालुक्यावर दोन्ही आघाड्यांनी लक्ष केंद्रित केले होते.

महादेवराव महाडीक यांच्या नेतृत्वाखाली उभे असलेल्या राजर्षि शाहू पॅनेलला आमदार सदाशिवराव मंडलीक, खासदार कल्लाप्पा आवाडे, आमदार यशवंत एकनाथ पाटील, आमदार प्रकाश आवाडे, आमदार संपतराव पवार पाटील, आमदार संजयसिंह गायकवाड, आमदार नामदेवराव भोईटे, तसेच जि.प. अध्यक्ष, काही माजी आमदार, महापौर, उपमहापौर, जिल्हा बँकेचे काही संचालक, दूध संघ व पंचायत समितीचे पदाधिकारी व सदस्य, बिद्री, भोगावती साखर कारखान्यांचे चेअरमन असा व्यापक पाठींबा होता. जिल्हा बँकेचे चेअरमन हसनसाहेब मुश्रीफ हे आघाडीचे प्रचार प्रमुख होते.[११] या आघाडी विरोधात श्री महालक्ष्मी शेतकरी सेवा आघाडी निवडणूक रिंगणात होती. या आघाडीचे नेतृत्व जिल्ह्यातील ज्येष्ठ नेते खासदार उदयसिंगराव गायकवाड व मान. श्रीपतरावजी बोंद्रे (माजी कृषी राज्य मंत्री) यांनी केले होते. या आघाडीस दे.भ.आ.डॉ. रत्नाप्पा कुंभार, आमदार दिग्वीजय खानविलकर, आमदार बाबासाहेब कुपेकर, आमदार जयवंतराव आवळे, आम.

अशोकराव जांभळे, श्रीमती निवेदिता माने, यांच्यासह काही माजी आमदार व सहकारातील नेतेमंडळींचे पाठबळ होते.[१२]

बाजार समितीची ही निवडणूक साडे सहा तालुक्यापुरती मर्यादित होती तरीही या निवडणुकीत कार्यक्षेत्राबाहेरील जिल्ह्यातील राजकीय नेतेमंडळींचा सहभाग होता. महादेवराव महाडीक यांच्या विरोधात खास. उदयसिंगराव गायकवाड, श्रीपतराव बोंद्रे, पी. एन. पाटील, दिग्वीजय खानविलकर, विक्रमसिंह घाटगे यांच्या नेतृत्वाचा कस या निवडणूकीत लागणार होता. महादेवराव महाडीक यांना आम. मंडलीक व पन्हाळा, राधानगरी आणि भुदरगड तालुक्यातील नेतेमंडळींचा भक्कम पाठींबा होता. आम. महाडीक यांनी तत्पूर्वी नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषद, भुविकास बँक, जिल्हा सहकारी बँक, आणि महापालीकेच्या निवडणुकीत आपल्या आघाडीची सत्ता निर्माण केली होती. त्यामूळे आपले राजकीय वर्चस्व आबाधित ठेवण्यासाठी बाजार समितीची निवडणूक ही त्यांनी ताकतीने लढविली. बाजार समितीच्या निवडणुकीनंतर कोल्हापूर जिल्ह्यातील राजकीय वर्चस्व स्पष्ट करणारी जिल्हा दूध संघाची (गोकूळ) निवडणूक होणार असल्याने बाजार समितीतील निवडणूक निकालाला महत्व प्राप्त झाले होते.

बाजार समितीच्या चुरशीने झालेल्या निवडणुकीत महाडीक गटाचे राजर्षि शाहू आघाडीचे सर्व उमेदवार विजयी झाले. या आघाडीमध्ये सर्व उमेदवार नुतन संचालक म्हणून निवडून आले. तर विरोधी आघाडीतून विद्यमान अध्यक्ष उपाध्यक्षासह, दोन माजी अध्यक्ष व एक माजी महापौर पराभूत झाले. कोल्हापूर जिल्ह्याच्या राजकारणातील नवी समीकरणे स्पष्ट करणारा निकाल म्हणून या निकालाकडे पाहीले गेले. प्रमुख विजयी उमेदवारामध्ये उपमहाराष्ट्र केसरी संभाजी पाटील, बाबूराव नष्टे, अरूण चौगुले, जयसिंगराव पाटील (भाडळेकर), बाबगोंडा मलगोंडा पाटील, शामराव आण्णा पाटील व धोंडीराम वारके यांचा समावेश होता. प्रमुख पराभूत उमेदवारामध्ये विद्यमान सभापती बंडोपंत पाटील (म्हाकवेकर), माजी सभापती बाबासाहेब पाटील (भुयेकर),बी. के. पाटील(सोनाळीकर), सतीश पाटील (आकूर्डेकर), निवृत्ती दळवी, महादेव चावरे व पी.टी. पाटील

यांचा समावेश होता. या निवडणुकीनंतर जिल्ह्यातील राजकीय नेत्यांचे लक्ष गोकुळ दुधसंघाच्या निवडणूकीकडे लागले होते.[१३]

विजयाबद्दल प्रतिक्रिया व्यक्त करताना विजयी गटाचे प्रमुख महादेवराव महाडीक म्हणाले, ''राजर्षी शाहू आघाडीच्या तत्त्वावर ग्रामीण भागातील लोक प्रतिनिधी आणि सहकारातील कार्यकर्त्यांनी दाखविलेला विश्वास या निवडणूक निकालातून स्पष्ट होतो.'' पराभूत महालक्ष्मी पॅनेलमधील प्रमुख उमेदवार व माजी सभापती बाबासाहेब पाटील (भूयेकर) म्हणाले, ''मतदारांचा कौल मानणारे आम्ही कार्यकर्ते आहोत करवीर आणि शाहूवाडी तालुक्यात आम्हाला अपेक्षेइतके मतदान झाले नाही.'' बाजार समितीतील विजयामुळे महाडीक गटाची राजकीय ताकद वाढली. बाजार समितीच्या राजकारणात ज्येष्ठ नेते श्रीपतराव बोंद्रे यांची सत्ता बराच काळ होती. महाडीक यांनाही याच गटाने बाजार समितीत शिरकाव करू दिला होता आणि आता महाडीक यांच्यामुळे या गटाची बाजार समितीतील सत्ता संपूष्टात आली होती. जिल्ह्यातील बहूतेक सर्वच राजकीय नेत्यांनी या निवडणूकीत राजकीय सहभाग घेतला होता. राजर्षि शाहू आघाडीला पन्हाळा, गगनबावडा, राधानगरी, भुदरगड व कागल येथे मताधिक्य मिळाले. महालक्ष्मी शेतकरी सेवा आघाडीला करवीर व शाहूवाडी या दोन तालुक्यात अत्यल्प मताधिक्य मिळाले. एकूनच या निवडणूकीत महादेवराव महाडीक विरूध्द इतर ज्येष्ठ नेतेमंडळी यांच्यामध्ये राजकीय ताकद पणाला लागली होती. त्यामध्ये महाडीक यांनी बाजार समितीवर वर्चस्व मिळवून जिल्ह्याच्या राजकारणातील आपले स्थान भक्कम केले होते.

समिती निवडणुकीनंतर दिनांक २८.०१.१९९७ रोजी मान. संभाजी आकाराम पाटील (पैलवान) यांची बाजार समितीच्या सभापतीपदी निवड झाली. त्यांनी १९९७ ते मे २००२ अशी पूर्ण कारकीर्द यशस्वी केली. उपसभापती म्हणून श्री शंकरराव चौगुले यांना मान मिळाला. बाजार समितीच्या जाने. १९९७ मध्ये झालेल्या निवडणुकीचे वैशिष्ट्ये म्हणजे गेली अनेक वर्षे श्री श्रीपतरावजी बोंद्रे (माजी कृषी राज्य मंत्री) यांच्या गटाची सत्ता रितसर सुंपष्टात येवून बाजार समितीच्या कारभारात महादेवराव महाडीक यांचे नेतृत्व निर्माण झाले. बाजार समितीच्या या

निवडणूक निकालानंतर कोल्हापूर जिल्हा दूध संघाची निवडणूक झाली. या निवडणूक निकालाचा फायदा महाडीक यांच्या आघाडीला दूधसंघातही झाला.

काही कालखंडानंतर एकत्र निवडणूक लढविलेल्या महादेवराव महाडीक व आम. सदाशिवराव मंडलीक यांच्यामध्ये राजकीय विरोध चालू झाला. राज्याच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेसची स्थापना झाल्यानंतर या राजकीय संघर्षाला धार आली. त्याचा परिणाम बाजार समितीमधील राजकारणावरही झाला. पर्यायाने पुढील निवडणूक महादेवराव महाडीक यांची काँग्रेस पक्षाची आघाडी व मंडलीक यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस प्रणीत आघाडी यांच्यामध्ये झाली.

## कोल्हापूर उत्पन्न बाजार समिती - निवडणूक एप्रील २००२ :

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीच्या संचालक मंडळातील सतरा जागासाठी दिनांक २१ एप्रील २००२ रोजी निवडणूक झाली. या निवडणूकीमध्ये सत्तारूढ काँग्रेसप्रणीत राजर्षि शाहू आघाडी आणि राष्ट्रवादी काँग्रेसप्रणित शेतकरी विकास आघाडीत मुख्य लढत झाली. त्याचबरोबर शेतकरी संघटनेचे ७ उमेदवार निवडणूक रिंगणात होते.

कोल्हापूर जिल्ह्यातील राजकारण राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या निर्मितीपूर्वी काँग्रेस अंतर्गत गटामध्ये होत होते. राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थापनेनंतर काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यामध्येच जिल्ह्यातील सत्तास्थाने काबीज करण्यासाठी सत्तासंघर्ष झाला आहे. कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, जिल्हापरिषद व पंचायत समितींच्या निवडणूका एकापाठोपाठ झाल्या. कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामीण राजकारणाशी संबंधीत या संस्थाबरोबरच जिल्हा दूध संघ(गोकूळ) याही आर्थिक ताकद असलेल्या संस्थेची निवडणूक बाजार समितीच्या निवडणूकीपूर्वी झाली. पण न्यायालयीन लढाईमुळे त्याची मतमोजणी झाली नाही. जिल्हा दूध संघाच्या निकालापूर्वी बाजार समितीच्या निवडणूकीचा निकाल होणार असल्याने दोन्ही काँग्रेसच्या दृष्टीने बाजार समितीतील लढतीला विशेष महत्व होते. कोल्हापूर जिल्ह्यातील ग्रामीण राजकारणावरील वर्चस्व सिध्द करण्यासाठी काँग्रेस विरूध्द राष्ट्रवादी काँग्रेस अशी सरळ लढत बाजार समितीच्या निवडणूकीत झाली. दोन्ही पक्षांची राजकीय ताकद आजमावण्याच्या दृष्टिनेही निवडणूकीला महत्व प्राप्त झाले होते. बाजार समितीच्या

निवडणुकीत १७ जागांसाठी ११९ उमेदवार निवडणूक रिंगणात होते. कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी गटनिहाय मतदार संख्या खालील प्रमाणे -

**१) शेतकरी प्रतिनिधी :**

अ) सहकारी विकास संस्था प्रतिनिधी - एकूण सदस्य संख्या - ९

(खुला वर्ग- ७, महिला प्रतिनिधी-२)

सदर गटामध्ये ९९२७ मतदार संख्या आहे.

ब) ग्रामपंचायत प्रतिनिधी- एकूण सदस्य संख्या - ४

(खुला वर्ग-२, अनुसुचित जाती जमाती-१, आर्थिक दुर्बल-१)

सदर गटामध्ये ४९८५ मतदार संख्या आहे.

**२) व्यापारी प्रतिनिधी :**

एकूण सदस्य संख्या - २

सदर गटामध्ये १०३७ मतदार संख्या आहे.

**३) सहकारी खरेदी विक्री संस्था प्रतिनिधी -**

एकूण सदस्य संख्या १

सदर गटामध्ये ९७७ मतदार संख्या आहे.

**४) हमाल, तोलाईदार प्रतिनिधी -**

एकूण सदस्य संख्या १

सदर गटामध्ये ७९३ मतदार संख्या आहे.

बाजार समितीचे कार्यक्षेत्र जिल्ह्यातील करवीर, पन्हाळा,राधानगरी, भुदरगड, शाहुवाडी, गगनबावडा, व कागल तालुक्यातील वेदगंगा नदीच्या उत्तरेकडील ४३ गावे असे साडेसहा तालुक्यांचे आहे. समितीच्या कार्यक्षेत्रात एकूण ७१२ गावे समाविष्ट असून सर्व गावातील विविध कार्यकारी सेवा संस्थांचे संचालक व ग्रामपंचायत सदस्य यांचे बाजार समितीच्या निवडणुकीत मतदान असल्याने या निवडणुकीस राजकीयदृष्ट्या विशेष महत्व असते. बाजार समितीची निवडणूक काँग्रेस व राष्ट्रवादी

काँग्रेस यांच्यातच चुरशीने लढविली गेली काँग्रेस पक्षाने त्यावेळचे विद्यमान अध्यक्ष संभाजीराव पाटील यांच्यासह तीन विद्यमान संचालकांना तसेच समितीच्या दोन माजी संचालकांना व १२ नवीन चेहऱ्यांना आपल्या आघाडीमध्ये उमेदवारी दिली होती.त्यामध्ये करवीर तालुक्यातील-५, राधानगरी, पन्हाळा, शाहुवाडी तालुक्यातील प्रत्येकी-२, आणि भुदरगड, कागल आणि गगनबावडा तालुक्यातील प्रत्येकी-१ उमेदवारास आघाडीमध्ये संधी दिली होती. काँग्रेस पक्षाची उमेदवार यादी पक्षाचे जिल्हाध्यक्ष पी. एन. पाटील, आमदार महादेवराव महाडीक, चंद्रकांत बोंद्रे, आमदार संजिवनी गायकवाड, सतेज पाटील, संदिप नरके, विश्वास नारायण पाटील, आमदार बजरंग देसाई आदींनी एकत्रित बसून ठरविली होती.[१४] राष्ट्रवादी काँग्रेसने काँग्रेसची यादी जाहीर झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी माघारीची मुदत संपण्यास तासाभराचा आवधी असताना आपली उमेदवार यादी जाहीर केली. या पक्षाने पाच विद्यमान संचालकांना पुन्हा संधी दिली. आघाडीतील शेतकरी कामगार पक्षाला एकच जागा दिली.राष्ट्रवादीने करवीर व पन्हाळा तालुक्याला प्रत्येकी चार, शाहूवाडी, भुदरगड आणि राधानगरी तालुक्यात प्रत्येकी दोन, तर कागल तालुक्याला एक अशा प्रकारे उमेदवार दिले. समितीच्या व्यापारी प्रतिनिधी गटातील मतदार यादीच्या चौकशीसाठी न्यायालयीन लढाई खेळलेल्या बाळासाहेब मनाडे व नयन प्रसादे यांना पक्षाने उमेदवारी दिली. राष्ट्रवादी आघाडीचे उमेदवार निश्चित करण्यासाठी पक्षाच्या नेत्यांची शासकीय विश्रामधामवर बैठक झाली. त्यास खासदार सर्वश्री सदाशिवराव मंडलीक, श्रीमती निवेदिता माने, आरोग्यमंत्री दिग्विजय खानविलकर, सहकार राज्यमंत्री बाबा कुपेकर, दुग्ध विकास राज्यमंत्री हसन मुश्रीफ, जिल्हा बँकेचे अध्यक्ष के. पी. पाटील, उपाध्यक्ष बाबूराव हजारे, संचालक व्ही. बी.पाटील, आनंदराव पाटील चुयेकर, संजय पाटील आदि नेतेमंडळी उपस्थित होती.[१५]

बाजार समितीच्या निवडणुकीत काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस आघाडीमध्ये त्या त्या तालुक्यातील नेत्यांनी आपल्या कार्यकर्त्यांना संधी दिली आहे. निवडणुकीत काँग्रेस प्रणित सत्तारूढ राजर्षि शाहू आघाडी व राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित शेतकरी विकास आघाडी यांनी आपले राजकीय वर्चस्व सिध्द करण्यासाठी व जिल्हा पातळीवरील महत्वाचे सत्ताकेंद्र आपल्या ताब्यात असावे म्हणून

चुरशीने प्रचार यंत्रणा राबविली. बाजार समितीसाठी समितीचे कार्यक्षेत्र असलेल्या साडेसहा तालुक्यात ८३ मतदान केंद्रावर मतदानाची व्यवस्था करण्यात आली होती. जवळपासची दहा ते अकरा गावे एका मतदान केंद्राशी जोडण्यात आली होती. त्यामूळे सर्वत्रच मतदारांना मतदानासाठी आणताना वाहनांचा वापर मोठ्या प्रमाणात झाला. अत्यंत चुरशीने ९५% मतदान झाले सर्व मतदान प्रक्रिया शांततेत झाली.पुरूष मतदारांबरोबरच महिलांचे प्रमाणही लक्षणीय होते.

कोल्हापूर शेती उत्पंन्न बाजार समितीच्या निवडणूकीची मतमोजणी कोल्हापूर उद्योगभवन येथे झाली. निवडणुक अधिकारी प्रकाश कदम यांच्या मार्गदर्शनाखाली मतमोजणी शांततेत पार पडली. निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसप्रणित शेतकरी विकास आघाडीला १५ पैकी १३ जागा मिळाल्या, व्यापारी प्रतिनिधी गटातील मतदारांचा वाद न्यायालयात गेल्याने या गटातील दोन जागांची मतमोजणी झाली नाही. तथापि राष्ट्रवादीला स्पष्ट बहुमत मिळाले. समितीचे माजी अध्यक्ष संभाजीराव पाटील यांच्यासह तीन विद्यमान संचालकांचा पराभव झाला. पाच विद्यमान संचालक निवडून आले तर दहा नव्या चेहऱ्यांना संधी मिळाली.

जिल्हा बँक आणि जिल्हापरिषदेच्या पाठोपाठ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने मित्र पक्षांच्या सहकार्यांने काँग्रेसकडील हे महत्वाचे सत्ताकेंद्र आपल्या ताब्यात घेवून आपली विजयी घोडदौड कायम ठेवली. शेतकरी संघटनेच्या उमेदवारांना तीन अंकी मते ही मिळाली नाहीत राष्ट्रवादी काँग्रेसने या विजयाने ग्रामीण राजकारणावर आपल्याच पक्षाचे वर्चस्व असल्याचे सिध्द केले. राष्ट्रवादीने सामुहिक नेतृत्वाखाली ही निवडणुक लढविली. तर काँग्रेस आघाडीचे नेतृत्व जिल्हाध्यक्ष पी. एन. पाटील व आमदार महादेवराव महाडीक यांनी केले.नेत्यातील अंतर्गत दुही व प्रचारातील गाफीलपणा यामुळे काँग्रेसला अपयश आल्याचे निकालावरून स्पष्ट झाले. निवडणुकीत काँग्रेस स्वबळावर लढली होती तर राष्ट्रवादी बरोबर शेतकरी कामगार पक्षाची आघाडी होती. शेतकरी संघटनेने सेवा संस्था गटात सात उमेदवार उभे केले होते पण मतदरांनी अपक्ष उमेदवाराप्रमाणेच त्यांची फारशी दखल घेतली नसल्याचे मतदानावरून स्पष्ट झाले. सत्तारूढ काँग्रेसप्रणीत राजर्षी शाहू आघाडीला हमाल तोलाईदार गटातील एक जागा व प्रक्रिया संस्था गटातील एक जागा राष्ट्रवादी पॅनेलला मिळाल्या.

निकालानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा अध्यक्ष के. पी पाटील यांनी "राष्ट्रवादी काँग्रेस व मित्र पक्षांच्या एकजुटीचा हा विजय असून जनतेला हवे होते ते मतपेटीतून व्यक्त झाले," अशी प्रतिक्रिया व्यक्त केली. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष पी.एन. पाटील म्हणाले, "उमेदवाराबाबतची नाराजी आणि शेतकरी संघटनेचे पॅनेल यांचा एकत्रित परिणाम म्हणून आमचा पराभव झाला." जिल्हाबँकेचे चार संचालक राष्ट्रवादीकडे होते. एकट्या करवीर तालुक्याने त्यास थोपवणे शक्य नव्हते. शिवाय करवीरमध्येही मताधिक्य कमी मिळाले. निकालानंतर प्रतिक्रिया व्यक्त करतांना विद्यमान अध्यक्ष संभाजीराव पाटील यांनी "जिल्हा बँकेतील राष्ट्रवादी काँग्रेसच्या सत्तेमुळे सेवा संस्था गटात आमचा पराभव झाला." असे सांगितले.[१६]

समितीच्या कार्यक्षेत्रात जिल्हाबँकेच्या माध्यमातून विकास सेवा संस्थावर राष्ट्रवादी काँग्रेसचा प्रभाव असल्यामुळे त्याचा फायदा या पक्षाला झाला. जिल्हा बँकेच्या निवडणुकीत भुदरगड, कागल आणि राधानगरी तालुक्यातील सेवा संस्था गटातील जागा राष्ट्रवादीला मिळाल्या होत्या. करवीर गगनबावडा, शाहुवाडी तालुक्यातील जागा काँगेसला मिळाल्या होत्या. शाहुवाडी तालुक्यातून काँग्रेसचे मानसिंग गायकवाड बिनविरोध निवडून आले होते परंतु बाजार समितीच्या निवडणुकीत ते राष्ट्रवादी काँग्रेसच्या पॅनेलबरोबर होते. त्याचाही फायदा राष्ट्रवादी काँग्रेसला झाला. करवीर व पन्हाळा तालुक्यातील मतदानाच्या जोरावर राधानगरी, भुदरगड सह इतरत्र असलेले राष्ट्रवादीचे वर्चस्व मोडून काढू असा दावा काँग्रेसचे नेते करत होते. पण त्यांना दावा सत्यात उतरवता आला नाही. करवीरमधील पी.एन.पाटील यांच्या वर्चस्वाला आरोग्यमंत्री दिग्वीजय खानविलकर, आमदार संपतराव पवार, आनंदराव पाटील(चुयेकर), पी.डी.पाटील, बाबूराव हजारे यांनी एकत्रितरित्या शह दिला. पन्हाळ्यात अरूण नरके यांच्या ताब्यातील प्रत्येक सेवा संस्थेशी आमदार विनय कोरे यांनी संपर्क साधला. त्याचाही फायदा राष्ट्रवादी पॅनेलला झाला. राष्ट्रवादीच्या सामूदायिक प्रयत्नामुळे करवीर व पन्हाळा तालुक्यात काँग्रेसला अपेक्षीत मताधिक्य मिळाले नाही. त्यामुळे सेवा संस्था गटातील एकही जागा काँग्रेसला मिळाली नाही. सेवासंस्था गटामध्ये कागल तालुक्यात खासदार मंडलीक व नामदार मुश्रीफ यांच्या वर्चस्वामुळे राष्ट्रवादीला मताधिक्य मिळाले. राधानगरी,

भुदरगडमध्ये राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष के. पी. पाटील यांच्या संपर्कामुळे व जिल्हा बँक संचालक ए.वाय.पाटील व इतर कार्यकर्त्यांच्या सहकार्याने राष्ट्रवादीला उच्चांकी मताधिक्य मिळाले. शाहुवाडी तालुक्यातही राष्ट्रवादीला मताधिक्य मिळाले. ग्रामपंचायत प्रतिनिधी गटामध्ये ही राष्ट्रवादी काँग्रेसला चांगले मताधिक्य मिळाले. सेवासंस्थागट व ग्रामपंचायत गटातून विजय मिळवत राष्ट्रवादी काँग्रेसने काहीशी अवघड असलेली सत्ता एकतर्फी जिंकली. नेत्यातील समन्वय सर्व तालुक्यांना योग्य प्रकारे दिलेले प्रतिनिधित्व, चांगल्या उमेदवारांना दिलेली संधी आणि विजयासाठी लढण्याची वृत्ती या बळावर राष्ट्रवादी काँग्रेसने ही सत्ता काबीज केली. जिल्हा बँक, जिल्हा परिषद व बहुसंख्य पंचायत समित्या मध्ये विजय मिळवत राष्ट्रवादी काँग्रेसने बाजार समितीतही आपली सत्ता स्थापन केली. जिल्हा बँक, जिल्हा परिषदेपाठोपाठ बाजार समितीतही पराभव झाल्याने काँग्रेसला पराभवाची मालीका खंडीत करण्यासाठी विचार करावा लागणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी आपआपल्या तालुक्यात कशी जास्त मते मिळतील यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले. विरोधकांच्या ताब्यातील सेवासंस्था, ग्रामपंचायती येथीलही मतदान मिळविण्यासाठो त्यांनी प्रयत्न केले. याऊलट काँग्रेस पक्षातील नेत्यांनी एकसंघपणे निवडणूक प्रचार केला नाही. राष्ट्रवादीच्या सामुदायिक प्रयत्नामुळे जिल्हा बँक, जिल्हा परिषद आणि बाजारसमिती या जिल्हापातळीवरील मोठ्या संस्था आणि ९ पंचायत समित्यांचे सभापती एवढे सत्तेचे बळ राष्ट्रवादी काँग्रेस व मित्रपक्षांच्या आघाडीने मिळविले. त्याचबरोबर जिल्ह्यातील दोन्ही खासदार व तीन मंत्र्यांचे पाठबळ या आघाडी सोबत होते.

बाजारसमिती निवडणूक जिंकण्यासाठी जिल्हा बँक व जिल्हा परिषदेतील सत्तेचा फायदा राष्ट्रवादी आघाडीला झाला आहे. बाजार समितीतील विजयाने राधानगरी भुदरगड तालुक्यातील जिल्हाध्यक्ष के. पी. पाटील यांची राजकीय ताकद वाढली आहे. पन्हाळ्यात विनय कोरे यांनी आपला गट अधिक मजबूत केला आहे. बाजार समितीच्या निकालाचा सर्वांगिण विचार करता राष्ट्रवादी काँग्रेसची नेतेमंडळी व कार्यकर्ते या सर्वांच्या सामूदायिक प्रयत्नातून राष्ट्रवादीचे यश साकारले आहे.

बाजारसमितीच्या निवडणूक निकालानंतर प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या समितीच्या सभापती निवडीच्या राजकीय हालचाली सुरू झाल्या. समितीमध्ये निवडून आलेले संचालक आपआपल्या तालुक्यातील नेत्यांचे आदेश मानून काम करतात. तालुक्यातील नेतेमंडळीही या जिल्हा पातळीवरील संस्थेवर आपल्या कार्यकर्त्याला सत्ता मिळावी यासाठी प्रयत्न करतात. कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीच्या सभापतीपदासाठी फेरनिवड झालेले बाबगोंडा पाटील व धोंडीराम वारके यांच्याबरोबरच पी.डी.पाटील, रंगराव मोळे व कृष्णराव पाटील हे संचालक इच्छुक होते. खासदार मंडलीक व नामदार मुश्रीफ श्री बाबगोंडा पाटील यांच्या निवडीसाठी आग्रही होते. तर के.पी. पाटील व राधानगरी तालुक्यातील नेतेमंडळींनी श्री वारके यांच्यासाठी आग्रह धरला होता. आमदार विनय कोरे यांनी आपले कार्यकर्ते श्री रंगराव मोळे यांना संधी मिळावी असा प्रयत्न केला होता. इच्छुकांमधील नावाबाबत एकमत होत नसल्याने सर्व नेतेमंडळींनी एकत्र बसून पहिल्यावर्षी सभापतीपदी बाबगोंडा मलगोंडा पाटील व उपसभापतीपदी धोंडीराम गोपाळ वारके यांची नावे निश्चित केली. संचालक मंडळाच्या बैठकीत यांची बिनविरोध निवड झाली. श्री बाबगोंडा पाटील यांची समितीचे २७ वे सभापती तर श्री वारके यांची १९ वे उपसभापती म्हणून निवड झाली. सभापती व उपसभापती समितीवर दुसऱ्यांदा शेतकरी प्रतिनिधी म्हणून निवडून आले आहेत. मावळत्या संचालक मंडळात सत्तारूढ गटाच्या विरोधात जावून न्यायालयीन लढाई लढण्यात ते आघाडीवर होते. त्याची नोंद म्हणून त्यांना पहिल्या वर्षी संधी देण्यात आली. कागल तालुक्याला सभापतीपदाची संधी दुसऱ्यांदा मिळत आहे. यापूर्वी बंडोपंत पाटील(म्हाकवेकर) सभापती होते. नूतन सभापती बाबगोंडा पाटील यापूर्वी जिल्हापरिषदेचे उपाध्यक्ष, बांधकाम सभापती व दहा वर्षे सदस्य होते. उपसभापती वारके भुदरगड पंचायत समितीचे सभापती होते.

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीच्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये १७ जागासाठी मतदान झाले होते. परंतू व्यापारी प्रतिनिधी गटातील मतदारांचा वाद न्यायालयात गेल्याने या गटातील दोन जागांची मतमोजणी झाली नव्हती. न्यायालयीन लढाईनंतर मतमोजणीबाबत निर्णय झाला त्यामध्ये व्यापारी प्रतिनिधी म्हणून श्री नंदकुमार वळंजु व श्री अतुल शहा यांची निवड झाली. हे दोन्ही संचालक

बाजार समितीत महादेवराव महाडीक यांचे नेतृत्व मानून काम करतात. त्यामुळे बाजार समितीत महाडीक गटाची संचालक संख्या पाच झाली. कोल्हापूर महानगरपालीकेचे प्रतिनिधी म्हणून नगरसेवक श्री आदमशेख यांची बाजार समितीच्या संचालकपदी फेरनियुक्ती झाली. तेही आमदार महादेवराव महाडीक यांचे नेतृत्व मानून काम करतात. श्री नंदकुमार वळंजु हे संचालक म्हणून काम करत असतानाच त्यांची कोल्हापूर महानगरपालीकेच्या महापौरपदी निवड झाल्याने आमदार महादेवराव महाडीक यांच्या गटास बाजार समितीत राजकीय ताकद मिळविण्यासाठी त्यांनी विशेष असे प्रयत्न केले. त्यांच्या महापौरपदाचा बाजार समितीला कामकाजामध्ये फायदा झालेला आढळतो.

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीच्या नवनियुक्त संचालक मंडळाने धान्यबाजार उभारणी संदर्भात प्रयत्न चालू केले. धान्य बाजाराचा पायाभरणी शुभारंभ खासदार शरदरावजी पवार यांच्या हस्ते केला. शेतकऱ्यासाठी शेतीविषयक चर्चासत्रे घेतली. बाजारसमितीमध्ये विकास कामाबरोबरच नवीन सभापती, उपसभापती निवडीसाठी इतर इच्छुक संचालकांचे प्रयत्न चालू होते. सभापती, उपसभापती यांची निवड एक वर्षासाठी झाली आहे व त्यांनतर आपल्याला संधी मिळावी अशी इतर इच्छुक संचालकांची नेत्यांकडे मागणी होती जिल्हापरिषद व बाजारसमिती येथील पदाधिकारी बदला संदर्भात एकाचवेळी नेतेमंडळीमध्ये चर्चा चालू होती. आपल्या तालुक्यातील कार्यकर्त्याला पदाधिकारी पद मिळावे यासाठी नेतेमंडळींचे प्रयत्न चालले होते. पण पदाधिकारी बदलासंदर्भात निश्चित धोरण ठरविण्यात राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेतेमंडळींना यश आले नाही. राष्ट्रवादी काँग्रेसमधील १३ संचालकांमध्ये सभापती उपसभापती यांच्यासह पाच संचालकांचा एक गट विद्यमान सभापती उपसभापती यांना मुदतवाढ मिळावी म्हणून प्रयत्नशील होता. उर्वरित आठ संचालकांनी पदाधिकारी बदलासाठी नेत्यांकडे आग्रह धरला होता. सभापती उपसभापती निवडीतील संघर्ष वाढत राहीला. विद्यमान सभापती व उपसभापती यांनी आपल्याला मुदत वाढ मिळावी यासाठी प्रयत्न केले. पदाधिकारी राजीनामा देत नसल्यामुळे संचालकांनी अविश्वास ठराव आणण्यासाठी प्रयत्न केले. दुसऱ्या बाजूला आमदार महादेवराव महाडीक यांचे नेतृत्व मानणारे पाच संचालक बाजार समितीच्या

कामकाजात विद्यमान सभापती व उपसभापती यांना सहकार्य करत होते त्यामुळे कामकाजात दहा संचालक एका बाजूला व आठ संचालक एका बाजूला असे गट तयार झाले होते. विद्यमान सभापती व उपसभापती यांनी दीड वर्षाच्या कारकीर्दीत राष्ट्रवादीच्या नेत्यांनी विकास कामे करण्यास मज्जाव केल्याचे सांगत आमदार महादेवराव महाडीक यांच्या गटामध्ये प्रवेश केला. निवडणुकीमध्ये आमदार महादेवराव महाडीक यांच्याकडून राष्ट्रवादीने सत्ता काढून घेतली होती पण सभापती उपसभापती यांनी आमदार महादेवराव महाडीक यांच्या गटात प्रवेश करून त्यांच्या नेतृत्वाखाली बाजार समितीत काम करण्याचा निर्णय घेतल्याने. बाजारसमितीच्या राजकारणाला वेगळीच कलाटणी मिळाली व पुन्हा एकदा बाजार समितीची सत्ता आमदार महादेवराव महाडीक यांच्या गटाच्या ताब्यात गेली. सभापती-उपसभापतींवर अविश्वास ठराव आणावयाचा झाल्यास १२ संचालकांची आवश्यकता आहे. तथापि ११ सचालक असल्याने राष्ट्रवादीला काहीच करता येत नव्हते.[१७]

सत्ताबदलानंतर राष्ट्रवादी आघाडीकडे राहीलेल्या उर्वरित ११ संचालकांपैकी श्री रंगराव मोळे. श्री भाऊसो पाटील व श्री उदयसिंह पाटील(कावणेकर) यांनी आमदार महादेवराव महाडीक यांच्या गटात प्रवेश केला. राष्ट्रवादी आघाडीक डे त्यामुळे ८ संचालक राहीले व आमदार महादेवराव महाडीक गटाकडे १० संचालक झाल्याने बाजार समितीत महाडीक गटाचे बहूमत झाले आहे. सध्या श्री बाबगोंड पाटील यांचे नेतृत्वाखाली आमदार महादेवराव महाडीक गटाची बाजार समितीत सत्ता आहे.

बाजार समितीमधील संचालक हे आपआपल्या तालुक्यामध्ये काम करत असताना तालुक्यातील आपल्या गटाचे काम करताना आढळतात. विधानसभेच्या ऑक्टोबर २००४ मध्ये झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांची संयुक्त आघाडी होती. तरी सुध्दा आपल्या नेत्यांच्या सांगण्यावरून व आपल्या स्थानिक राजकीय सोयीनुसार बाजार समितीच्या संचालकांनी आपआपल्या नेत्यांना राजकीय पाठबळ दिले आहे. जिल्ह्यातील राजकारण सतत बदलत असते. त्यामुळे जिल्ह्यातील काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस व त्यातील नेतेमंडळींचे गट यामध्ये परिस्थितीनुरूप बदल होताना आढळतो. त्यामुळे बाजारसमितीमधील राजकारणावरही जिल्ह्यातील

राजकारणाचा परिणाम जाणवतो. जिल्ह्यातील बदलत्या राजकारणाचे प्रतिबिंब बाजार समितीच्या राजकारणामध्ये दिसून येते.

## समितीच्या विकासात राजकीय नेतृत्वाचे योगदान :

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समितीच्या राजकारणाचा आढावा घेता समितीमध्ये सार्वत्रिक निवडणूकीत राजकारणातील सत्तास्पर्धा व चुरस जाणवते. पण समितीच्या दैनंदिन कामकाजात बाजारपेठेच्या हितासाठी सर्व संबंधीत घटक व राजकीय नेतृत्व राजकारण विरहित दृष्टिकोन ठेवून समितीच्या विकासासाठी वाटचाल करताना दिसतात. बाजारापेठेच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या वाटचालीत राजकीय नेतृत्वाचे योगदान महत्वपूर्ण ठरले आहे. बाजारसमितीची मुहूर्तमेढ राजर्षि शाहू छत्रपतींनी रोवली आहे. त्यातच या बाजारसमितीच्या यशाचे श्रेय सामावले आहे. शाहूमहाराजांच्या उदार आश्रयाने या बाजारपेठेची स्थापना झाली व विकासपर्वास सुरवात झाली. राजर्षि शाहू महाराज हे अत्यंत मुत्सदी राजकारण धुरंधर असल्याने परिस्थितीचा कुशलतेने लाभ उठवून त्यांनी लोककल्याणाच्या आपल्या अंगीकृत कल्पना प्रत्यक्षात आणल्या. सहकारी व आधुनिक पध्दतीने शेती झाली पाहिजे. याकडे त्यांचा कटाक्ष होता. कोल्हापूरच्या शेतकऱ्याला आपला गुळ व इतर शेतीमाल कोल्हापूरातच विकता यावा व त्याच्या मालाला योग्य किंमत मिळावी यासाठी शाहू महाराजांनी बाहेरील व्यापारांना बोलावून व त्यांना सेवा सुविधा पुरवून शाहूपूरी व्यापार पेठेची स्थापना केली. त्यांच्या नेतृत्वाचा व आश्रयाचा बाजारपेठेच्या वाढीसाठी उपयोग झाला. आर्श्चयाची गोष्ट म्हणजे सुमारे १०५ वर्षापूर्वी हा व्यापार उघड पध्दतीने होत होता. राजर्षि शाहू लोकांचा राजा होते. कोल्हापूरच्या लोकजीवनावर त्याच्या महान शिकवणूकीचा, आदर्शाचा व कार्याचा खोल ठसा उमटला आहे. आजही बाजारपेठेत राजर्षी शाहूंबद्दल आदराची भावना आहे. त्यांच्याच नावाने ही बाजारपेठ ''श्री शाहू मार्केट यार्ड'' म्हणून देशभर ओळखली जाते.

छ. शाहू महाराजांच्या निधनानंतर छ. राजाराम महाराजांनी देखील आपल्या थोर पित्याचा वारसा चांगल्या प्रकारे चालविला. छत्रपतीच्या उदार आश्रयाने पेठेचा व्याप खूप वाढला. त्याबरोबर या पेठेच्या व्यवहारावर काहीतरी नियंत्रण असणे जरूर वाटल्याने १९४५ साली त्यावेळच्या कोल्हापूर

संस्थानकडून शेती उत्पन्नाचा मार्केट बाबतचा कायदा करण्यात आला. या कायद्याप्रमाणे कोल्हापूर दरबाराने गॅझेट करून ११ सभासदांची एक मार्केट कमिटी नेमली व मार्केट कमिटीच्या कामकाजाला प्रारंभ झाला. पुढे लवकरच या मार्केटकमिटीच्या सभासदांची संख्या १५ वर नेणेत आली. या मार्केट कमिटीने पहिले चेअरमन म्हणून त्यावेळचे कोल्हापूर संस्थानचे अकौंटट जनरल श्रीयुत नारायणराव गोपाळराव सरदेसाई यांची नियुक्ती केली.त्यांच्या ज्ञानाचा बाजारसमितीला चांगला उपयोग झाला. श्री देसाई यांनी कोल्हापूर सरकारने बाजारपेठांचा सर्व्हे करण्याच्या कामी जी समिति नेमली होती त्या समितीचे अध्यक्ष म्हणून काम केले होते. या मार्केट कमिटीची पहिली ऐतिहासीक सभा तत्कालीन रेव्हेन्यू मिनीस्टर ना. भास्करराव जाधव यांच्या अध्यक्षतेखाली झाली. मार्केट कमिटीची स्थापना करण्यात तत्कालीन डेव्हलपमेंट सेक्रेटरी श्री जे. पी. नाईक यांनीही हिरीरीने भाग घेतला होता.[१८]

पहिले लोकनियुक्त कार्यकारी सभापती म्हणून श्री द. मा. उर्फ डी. एम. साळोखे यांनी सप्टेंबर १९४६ ते डिसेंबर १९४८ या दोन वर्षाच्या काळामध्ये आपल्या अभ्यासू वृत्तीने अनेक प्रश्न मार्गी लावून मार्केट कमिटीच्या इतिहासात आपल्या नेतृत्वाची व कर्तृत्वाची निशाणी ठेवली आहे. ऑफिसची चोख व्यवस्था, मापाड्याच्या प्रशिक्षणाची सोय आणि कामाच्या गटवार पध्दतीचा पाया घालण्यात त्यांनी खूपच दूरदृष्टी दाखविली होती असे म्हणावे लागेल. मार्केट कमिटीचा सेक्रेटरी हा कमिटीचा नोकर असावा व कमिटीचा सेक्रेटरी कमिटीने स्वत: निवडावा ही भूमिका त्यांनी सरकारकडून मान्य करून घेतली. वांदा कमिटी, दलाल, खरेदीदार मापाडी, हमाल, गाडीवान, मोटर ट्रक वगैरेची लायसन फी ठरविणे इत्यादी अनेक प्रश्न मार्गी लावले होते. श्री द. मा. साळोखे यांची नजर अत्यंत व्यवहारी आणि अचूक होती. त्यांनी व्यापारपेठेतील एकूण व्यवहार पाहून दलालांनी शेतकऱ्यांना त्यांच्या होणाऱ्या एकंदर व्यवहाराची नोंदी असणारे पासबुक द्यावे अशी कल्पना आणली त्याप्रमाणे मार्केटकमीटीकडून पासबूके तयार करून घेवून ती दलालांना पुरविली आणि त्यावर ज्या त्या शेतकऱ्याच्या व्यवहारांच्या नोंदी करून घेऊन ती पासबुक योजना राबविली होती. नवीनच स्थापन झालेल्या कमीटीचे पोटनियमही त्यांच्याच कारकिर्दीत तयार झाले.

बाजारसमितीचे तिसरे चेअरमन म्हणून श्री डी. डी. पाटील टाकळीकर यांची निवड झाली. चेअरमनपदाचा बहूमान शेतकरी प्रतिनिधीस मिळाला. त्यांनी बाजारपेठेत उघड सौद्याला अधिकाअधिक वाव मिळावा, बिगर सौदा व्यवहारावर निर्बंध घालण्याचा प्रयत्न केला. श्री टाकळीकर यांच्याच प्रयत्नांने सुरू झालेली यार्डातील "श्रमीकांची सहकारी सोसायटी" अद्यापही यशस्वीपणे कामकाज करत आहे.बाजारसमितीचे चौथे चेअरमन म्हणून रावसो व्ही. टी. पाटील यांची निवड झाली. डिसेंबर १९४९ ते १ फेब्रुवारी १९५७ असा एकूण सात वर्षांची प्रदीर्घ कारकिर्द त्यांना मिळाली. या कालखंडाचे वर्णन मार्केटच्या इतिहासातील क्रांतीकारी पर्वकाल असे केले जाते. एक प्रगतशील कार्यक्षम, पुरोगामी मार्केट कमिटी अशी जडण-घडण याच काळात झाली. मार्केट कमिटीच्या कामकाजाचे एक जीवंत मंदीर कमिटीच्या इमारतीचे बांधकाम याच काळात उभे राहिले. या काळाचे शिल्पकार रावसो व्ही.टी.पाटील हे आहेत. त्यांनी सरकारच्या गुळ दर नियंत्रणास विरोध करून गुळदर वाढीसाठी प्रामाणिक प्रयत्न केला. गुळाचे बदले रवे काढणेवर नियंत्रण आणले. गुळाची परदेशी निर्यात करण्याची कल्पना त्यांनी मांडली. शेतकऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी चांगला ऊस व उत्तम गुळ उत्पादकाला स्पर्धेद्वारे चांदीच्या दोन फिरत्या ढाली देणेत आल्या. १९५४ साली केंद्र सरकारच्या अर्थखात्याने मार्केट कमिटीवर इन्कम टॅक्स बसविला. कमिटीकडून कोणताही धंदा चालविला जात नसताना इन्कम टॅक्स केल्याने श्री व्ही.टी.पाटलांनी राज्यातील सर्व मार्केट कमिटी प्रतिनिधीना एकत्रित करून पद्मभूषण श्री वसंतराव दादा पाटील यांचे सहकार्याने इन्कम टॅक्स माफ करवून घेतला. श्री व्ही.टी.पाटील यांचा उल्लेख मार्केट कमिटीला अत्यंत अडचणीच्या काळात लाभलेले समर्थ राजकीय नेतृत्व असा करावा लागेल.[१९]

श्री व्ही. टी. पाटील यांच्या दिर्घकालीन कार्यकालानंतर श्री तात्यासाहेब गोविंदराव मोहिते यांची सन १९५७ साली चेअरमनपदी नियुक्ती झाली. कोल्हापूरच्या सहकारी चळवळीतील एक खंदे पुरूष म्हणून मोहिते यांना ओळखले जाते. तात्यासाहेब मोहितेंच्या कार्यकालामध्ये मार्केट यार्ड बांधण्याचे काम प्रगतीपतावर गेले. याचवेळी शेतकऱ्यांचा आलेला गुळ एखाद्या मध्यवर्ती ठिकाणी उतरून त्या गुळाची लवकरात लवकर विक्री होण्याच्या दृष्टीने सेलहॉल योजनेची कल्पना हैद्राबादहून

आलेल्या सरकारी अधिकाऱ्यांनी मांडली. कोल्हापूर मार्केट यार्ड हे एक अध्यावत मार्केट यार्ड व्हावे या हेतूने मोहिते यांनी ताबडतोब ही कल्पना उचलून धरली व कमिटीच्या मालकीचे तीन आणि शेतकरी सहकारी संघाचे तीन असे सहा सेलहॉल या मार्केट यार्डात बांधण्याचे काम हाती घेतले. या मार्केट यार्डात बाजारपेठ येण्याच्या दृष्टीने आणि सहाकारी संस्थानी आपली अडत दुकाने या पेठेत सुरू करण्याच्या मागे तात्यासोा मोहिते ही एक फार मोठी प्रेरकशक्ती होती. अत्यंत कल्पकता व शास्त्रशुध्द दृष्टिकोण असणाऱ्या तात्यासाहेबांचा बाजार समितीच्या उभारणीत मोठा वाटा आहे.

फेब्रुवारी १९५८ मध्ये चेअरमनपदी आलेल्या श्री आण्णासोा देसाई मडीलगेकर यांनी आपल्या कारकिर्दीत यार्डातील व्यवहाराला चांगले वळण लावण्याचा खंबीर प्रयत्न केला. त्यांचेनंतर श्री एकनाथ ज्ञानोबा पाटील यांची फेब्रुवारी १९५९ समितीच्या चेअरमनपदी निवड झाली. त्यांचे कारकिर्दीमध्ये भारत सरकारने या बाजारपेठेतील सौदे व इतर व्यवहारांचे चित्रिकरण करून ती फिल्म सर्व देशभर दाखविली. त्यानंतर फेब्रुवारी १९६० मध्ये शेतकरी प्रतिनिधी श्री शंकरराव देसाई यांची सभापतीपदी निवड झाली. त्यांच्या कारकिर्दीत महाराष्ट्राचे त्यावेळचे मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांनी श्री शाहू मार्केट यार्डाला भेट देऊन येथील "शेतकरी निवास" या इमारतीचे उद्घाटन केले. त्यांच्या कारकिर्दीचे अखेरीस साधारपणे पेठेतील सर्व प्राथमिक सुखसोयी पूर्ण झाल्या होत्या.

दिनांक २९.०६.१९६२ रोजी समितीचे नवीन सदस्य मंडळ अधिकारावर आले. श्री पिराजी वारके यांची चेअरमनपदी निवड झाली त्यांनी आपले लक्ष यार्डातील सुधारणांकडे दिले. त्यांचे एक वर्षाचे कारकिर्दीनंतर श्री पांडूरंग जगताप यांची चेअरमनपदी निवड झाली ते सहकारी संस्था प्रतिनिधी म्हणून निवडून आले होते. त्यांनी शेतकरी सहकारी संघाच्या गुळ विभागात अडत विभागाचे प्रमुख म्हणून काम केलेले असल्याने त्यांच्या अनुभवाचा फायदा समितीला झाला. त्यांनी यार्डातील हमालांची हमालीवाढ व तोलाईदारांची तोलाई वाढ व इतर प्रश्नांची अत्यंत समाधानकारक पध्दतीने सोडवणूक केली. श्री जगताप मास्तरांच्या नंतर १९६४ साली सरवडेचे तरूण कार्यकर्ते श्री पांडूरंग पाटील यांची चेअरमनपदी निवड झाली. त्यांच्या कारकिर्दीत घडलेली महत्वाची गोष्ट म्हणजे कमीटीच्या ऑफिसशेजारी मल्टीपर्पज हॉलची कल्पना पुढे आली. या एकाच इमारतीत रेकॉर्ड हॉल,

दवाखाना, अतिथी निवास, मोटार गॅरेज इत्यादी विविध सोयीचा अंतर्भाव होता. या बहुविधा सुविधागृहाचे बांधकाम त्यांच्या कारकिर्दीत सूरू झाले. त्यांचेनंतर मेजर दादासाहेब निंबाळकर हे जानेवारी १९६६ मध्ये चेअरमनपदी आले. त्यांच्या कारकिर्दीमध्ये बाजार आवारात शाहू महाराजांचे स्मारक उभे करण्याची योजना पुढे आली. त्यामध्ये शाहू महाराजांचा पुतळा,राजर्षी शाहू महाराजांच्या चित्रांची आर्ट गॅलरी, गुळ संशोधन केंद्र या बाबींचा समावेश होता. या योजनेत शेतकरी व व्यापारी यांनीही पाठींबा दिला व प्रत्यक्ष कामकाजास सुरवात झाली. त्यांच्याच कारकिर्दीत ऑफिसमधील मिटींग हॉलमध्ये शाहू महाराजांच्या तैलचित्राचे अनावरण त्यावेळचे महसूलमंत्री ना. बाळासाहेब देसाई यांचे हस्ते झाले. बाजार आवारात पोलीस संरक्षणाची सोय व्हावी यासाठी पोलीस चौकी बांधण्यात आली, मेजर दादासाहेब निंबाळकर यांनी खूप प्रयत्न करून राष्ट्रपतींना राजर्षी शाहूंच्या पुर्णाकृती पुतळा अनावरण समारंभासाठी आणले. ३० डिसेंबर १९६९ रोजी राजर्षी स्मारक समितीने पुर्णाकृती पुतळ्याचे अनावरण राष्ट्रपती श्री व्ही.व्ही.गीरी यांच्या हस्ते व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. वसंतराव नाईक यांचे अध्यक्षतेखाली केले. पुतळा अनावरण समारंभ भव्य असा होता. या प्रसंगी राष्ट्रपती श्री व्ही.व्ही. गीरी यांनी राजर्षींच्या कार्याचा अत्यंत समर्पक शब्दात गौरव केला. त्यांचेच कारकिर्दीत मिरज कोल्हापूर रेल्वे लाईनचे बॉडगेजमध्ये रूपांतर व्हावे यासाठी प्रयत्न झाले.

बाजारसमितीचे एक वयोवृध्द शेतकरी सभासद श्री भाऊसाहेब पोवार यांनी जानेवारी १९६७ साली चेअरमनपदाची सुत्रे हाती घेतली त्यांचेच कारकिर्दीत महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री (नियमन) अधिनियम १९६३ हा कायदा १५ मे १९६७ रोजी लागू झाला.या नव्या कायद्यामुळे काही क्रांतीकारक फेरफार होऊन त्याचा शेतकऱ्यांना लाभ मिळाला. यापुर्वी शेतकऱ्यांना भरावी लागणारी मार्केट फी या नव्या कायद्याने खरेदीदाराने भरावे असे ठरविण्यात आले. या कायद्याच्या अंमलबजावणीमुळे निर्माण झालेल्या वादळात भाऊसो पोवार यांनी शांतपणे व समंजसपणे या कमिटीचा कारभार हाकला व आपली फारमोठी योग्यता दाखवून दिली. मार्केट यार्डाच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी अत्यंत जिव्हाळ्याने प्रयत्न केले. दुर्देवाने आजारपणामुळे त्यांचे दिनांक ३०.०८.१९६९ रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या अकाली निधनानंतर समितीचे उपसभापती व

व्यापारी प्रतिनिधी श्री बाबूभाई पारिख यांनी कार्यकारी सभापती म्हणून जबाबदारी स्विकारली. याच काळात समितीने बांधलेल्या ''बहूविधा सुविधागृहाचा'' उद्घाटन समारंभ झाला.[२०]

सन १९७० हे साल बाजार समितीचे रौप्यमहोत्सवी वर्ष होते. रौप्यमहोत्सवी क्षणाला सभापती होण्याचे आगळे भाग्य श्री बाबूराव ज्ञानोबा देसाई यांना लाभले. शेतकऱ्यांचे नेतृत्व करणाऱ्या बाजारसमितीच्या रौप्यमहोत्सवी वर्षात शेतकरी नेते व शेतकरी प्रतिनिधी असलेल्या श्री बाबूराव देसाई यांना सभापतीं पदाचा बहूमान मिळाला. बाजार समितीने गेल्या २५ वर्षात विकासाची घौडदौड करत जी अनन्यसाधारण प्रगती केली आहे. त्या प्रगतीचे श्रेय बाजारपेठेच्या विकासासाठी प्रमाणिक प्रयत्न केलेल्या सर्वच घटकांना द्यावे लागेल. श्री बाबूराव देसाई यांनी बाजारसमितीच्या रौप्यमहोत्सव समारंभाला चालना दिली. समारंभाचे प्रमुख पाहूणे म्हणून त्यावेळचे भारताचे अर्थमंत्री यशवंतराव चव्हाण, अध्यक्ष म्हणून महाराष्ट्राचे मुख्यमंत्री वसंतराव नाईक, यांचे उपस्थितीत रौप्यमहोत्सव कार्यक्रम सोहळा पार पडला. याप्रसंगी रौप्यमहोत्सवी गौरव ग्रंथाचे प्रकाशन त्यावेळचे महाराष्ट्राचे सहकारमंत्री यशवंतराव मोहिते यांचे उपस्थितीत व पद्मभूषण वसंतरावदादा पाटील यांचे अध्यक्षतेखाली झाले. श्री देसाई यांनी बाजारसमितीमध्ये शेतकऱ्यांच्या हितासाठी अत्यंत जागरूकपणे आणि मुत्सदीपणाने प्रयत्न केले.

महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी विक्री(नियमन) अधिनियम, १९६३ व नियम, १९६७ हा कायदा बाजारसमित्यांना लागू झाल्यानंतर सार्वत्रिक निवडणूक होऊन दिनांक १.१०.१९७१ रोजी नवीन सदस्य मंडळ अस्तित्वात आले. नूतन सभापती म्हणून श्री दिनकरराव व्हरगे यांची निवड झाली. त्यांचे कार्यकालात बाजारसमितीतील डांबरी रस्ते, गटर्स व इतर बांधकामे लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या कामी विशेष प्रयत्न झाले. त्यांचेनंतर श्री बाबूराव पाटील यांनी नोव्हेंबर १९७२ ते ऑक्टोबर १९७४ पर्यंत सभापती पद सांभाळले ते एक अभ्यासू व शिस्तप्रीय होतकरु तरूण होते. याचा फायदा बाजारसमितीला झाला. त्यांचेनंतर श्री तुकाराम नाईक (उर्फ तुकाराम महाराज) यांनी समितीचे सभापतीपद दिनांक ७.१०.१९७४ ते २६.०९.१९७७ व ३०.०९.१९७७ ते ७.९.१९८१ असें दोनवेळा प्रदिर्घ काळ यशस्वीपणे संभाळले. त्यांनी समाजिक व सहकारी संस्थामध्ये विविध

क्षेत्रात विविध पदांवर काम केले होते. त्यांनी बाजारसमितीच्या सभापतीपदाच्या कार्यकालात तंबाखू, जंनावरे, व कांदा या बाजार व्यवहाराचे नियमन करून समितीच्या इतिहासात आपला ठसा उमटवला. राजर्षी शाहू महाराजांच्या पुतळा परिसरामध्ये श्री शाहू सांस्कृतीक हॉलचे सुमारे ४० लाख रूपये खर्चाचे इमारतीचे बांधकाम सुरू केले होते. आजही श्री शाहू सांस्कृतिक हॉल सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय कार्यक्रमांसाठी प्रसिध्द असून सुसज्ज रूपात आहे. त्यांच्या कार्यकिर्दीमध्ये समितीकडून तंबाखू गुदाम गाळे-१० व कांदा गुदाम गाळे-१० या दोन मोठ्या गुदाम इमारती व गरजेच्या वस्तूंचे दुकानगाळे-८ अशी इमारत यांची बांधकामे पूर्ण केली होती. तसेच टेंबलाईवाडी गुरे उपबाजारात प्राथमिक सुविधा केल्या होत्या.

शाहुवाडी तालुक्यातील सामाजिक व सहकारी संस्थांशी संबंधीत असलेले श्री श्रीपतराव हरी चौगुले हे सप्टेंबर १९७७ मध्ये सभापतीपदी विराजमान झाले. त्यांच्या एक वर्षाच्या कारकिर्दीत कागल उपबाजाराची स्थापना व भुसंपादनाचे कार्य पार पडले.करवीरमधील श्री बळंवत कृष्णाजी पाटील यांनी सप्टेंबर १९८१ ते जानेवारी १९८४ पर्यंत सभापतीपद भुषविले. ते श्रीपतराव बोंद्रे यांचे कार्यकर्ते होते. त्यांचें कारकिर्दीत उपबाजार स्थापनेसंदर्भात बरीचशी प्रगती झाली. तसेच मलकापूर उपबाजार आवारासाठी मलकापूर येथे २.५६ हेक्टर इतकी जमीन घेतली होती. त्यांच्या कारकिर्दीनंतर दिनांक १७.०१.१९८४ इ. रोजी महाराष्ट्र शासनाने बरीच वर्षे निवडणूक न झाल्याने राज्यातील ११ बाजार समित्यांचे संचालक मंडळ बरखास्त केले. त्यामध्ये कोल्हापूर बाजार समितीचा समावेश होता. या बाजार समितीवर दिनांक १९.०१.१९८४ ते ०३.०६.१९८६ पर्यंत प्रशासक म्हणून जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कोल्हापूर यांनी कामकाज पाहिले होते.

बाजारसमितीची सार्वत्रिक निवडणुक माहे मार्च १९८६ मध्ये झाली. ही निवडणूक दोन आघाड्यामध्ये चुरशीने लढविली गेली होती. त्यामध्ये आम. श्रीपतरावजी बोंद्रे व खास. गायकवाड यांच्या राजर्षी शाहू शेतकरी आघाडीने विजय संपादन केला होता. दिनांक ४ जून १९८६ इ. रोजी बोंद्रे गटाचे श्री बाबासाहेब ज्ञानू पाटील (भूयेकर) यांची सभापतीपदी निवड झाली त्यांनी ०४.०६.१९८६ ते ३१.०७.१९८७ व १६.१२.१९९१ ते ०९.०१.१९९६ असे दोन वेळा

सभापतीपद भुषविले. त्यांचे नेतृत्वाखाली व सर्व संचालक मंडळाच्या सहकार्याने मुख्य बाजार आवार व उपबाजार आवारातील विविध विकास कामांना चालना मिळाली होती. डांबरी व पक्के रस्ते, पाणी पुरविण्यासाठी बोअरवेल्स, सांस्कृतिक मंदिराला सुरक्षा भिंत, तसेच टेंबलाईवाडी बाजार आवारात सुधारणा करण्याचे काम त्यांच्या कारकिर्दीत झाले होते. त्यांनी फळे, भाजीपाला मार्केटमधील युनिट नं. २ ची उभारणी केली. तसेच फळे, भाजीपाला विभागात लिलाव हॉलची उभारणी केली. रस्ते, गटर्स व इतर बाजार आवारातील सुविधा पुर्ण करण्याचे काम त्यांच्या नेतृत्वाखाली झाले.

अलिकडेच झालेल्या बाजारसमितीच्या पंचवार्षिक निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसप्रणित आघाडी विजयी झाली. श्री बाबगोंडा मलगोंडा पाटील यांची सभापतीपदी निवड झाली. त्यांनी त्यांच्या सहकारी संचालक मंडळाच्या सहाय्याने शेतकरी हिताच्या अनेक योजना चालू केल्या आहेत. शेतकऱ्यांना नैसर्गिक शेतीचे महत्व पटवून देणेसाठी चर्चासत्रे आयोजित केली होती. गुळ उत्पादन व विक्री व्यवस्था प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत चर्चासत्रेही आयोजित केली होती. त्यांचे कारकिर्दीत टेंबलाईवाडी येथील धान्य बाजाराची उभारणी सुरू झाली आहे. धान्याबाजाराचा कोन शिला व भूमिपूजन समारंभ माननीय खासदार शरदचंद्र पवारसाहेब यांचे शुभहस्ते व उपमुख्यमंत्री नामदार छगन भुजबळ यांच्या अध्यक्षतेखाली व इतर राजकीय मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला व धान्य बाजाराची उभारणीचे काम वेगाने सुरू झाले आहे. केंद्रशासन पुरस्कृत योजनेअंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या कृषी विभागाच्या मदतीने श्री शाहू मार्केट यार्डवर बाजार माहिती केंद्राची स्थापना करण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे कदमवाडी येथे आरोग्यवर्धक गूळचाचणी प्रकल्प सुरू केला आहे. त्याचप्रमाणे बांबू, चिवे, उपबाजारासाठी जागा खरेदी करून त्याचे नियमन करणेत आले आहे. फुलांच्या नियमनाची प्रक्रीयाही पूर्ण झाली आहे. त्यांचे नेतृत्वाखाली संचालक मंडळाने गूळ निर्यात क्षेत्रासांठी शासनाकडे प्रयत्न सुरू ठेवले आहेत.[२१]

कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती मधील राजकारण व राजकीय नेतृत्व यांचा विचार करता कालानुरुप त्यामध्ये बरेचसे बदल झाले आहेत. सुरुवातीच्या काळात राजकीय ईर्षा व जागृती यांचा

अभाव असल्याने बाजारपेठेच्या परीसरातील प्रतिष्ठीत व प्रगतीशील शेतकरी यांनी व्यक्तिगत पातळीवर आपला संपर्क व प्रभाव यांचा उपयोग करून राजकारण केले आहे. मार्केट कायद्याच्या निर्मितीनंतर कायद्याने चालू झालेल्या निवडणूकामुळे खऱ्या अर्थाने तेथील राजकारणास सुरूवात झाली. आघाडी करुन निवडणूका लढविल्या जाऊ लागल्या. निवडणूकामध्ये परस्परविरोधी राजकीय नेतेमंडळी सहभागी झाले. राज्यातील व जिल्ह्यातील बदलते पक्षीय व गटातटाचे राजकारण यामुळे एकमेकाविरोधात राजकारण करणारे नेते व कार्यकर्ते आपल्या राजकीय सोयीनुरुप एकत्र येताना दिसतात.

सुरूवातीच्या काळात एकतर्फी होणाऱ्या निवडणूका अलीकडच्या काही वर्षामध्ये चुरशीने लढविल्या जात आहेत. येथील सत्तेचा राजकीय व आर्थिक सत्ताकेंद्र म्हणून सार्वत्रिक निवडणूकीमध्ये पक्षीय व व्यक्तिगत नेतृत्ववाढीसाठी उपयोग केला जातो. निवडणूकीमध्ये नेतेमंडळी आपल्या विश्वासू कार्यकर्त्यांना संधी देतात. त्याचप्रमाणे कार्यकर्त्याने सत्तेत आल्यानंतर आपल्या नेत्याच्या नेतृत्ववाढीसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न न केल्यास त्या कार्यकर्त्याला पूढील निवडणूकीत संधी दिली जात नाही. निवडणूकामध्ये व्यक्तिगत कामगिरीपेक्षा राजकीय नेत्यावरील निष्ठेचा संधी देताना विचार केला जातो. येथील राजकारणात मराठा समाजाचे विशेषत: त्यांच्यातील आर्थिक व राजकीय प्रभाव असलेल्या लोकांचे प्राबल्य आढळते. अलीकडच्या काळात कायद्यातील आरक्षणामुळे इतर मागासवर्ग, दुर्बल घटक व महिला प्रतिनिधींना समितीच्या संचालक मंडळात प्रतिनिधीत्व देण्यात आले आहे. यापूर्वी त्यांची दखल घेतली गेली नव्हती. महिला प्रतिनिधींना संधी देत असताना राजकीय कार्यकर्त्यांची सोय पाहून त्यांच्या कुटूंबातील महिलांना प्राधान्य दिले जाते.

एकंदरीतच बाजारसमितीतील राजकीय नेतृत्वाचा आढावा घेत असताना बाजार समितीच्या राजकारणात व प्रशासकीय कामकाजात सभापतीपदास अनन्यसाधारण महत्व आहे. आजपर्यंतच्या विकासात्मक वाटचालीत विकासकांमांची नोंद सभापतींच्या नेतृत्वाखाली झालेली दिसते. परंतू बाजार समितीच्या विकासात त्या त्या वेळचे उपसभापती व संचालक मंडळ यांचे धोरण निश्चितीतील योगदान नजरेआड करून चालणार नाही. सभापतीबरोबरच उपसभापती व संचालक मंडळातील सर्व

सदस्य हे तेवढ्याच तोलामोलाचे राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते आहेत. त्यांचा समिती कामकाजातील सहभाग विकासासाठी महत्वाचा ठरतो. संचालक मंडळाने आखलेल्या धोरणाची सभापतीच्या मार्फत अंमलबजावणी केली जाते. एकूणच आजपर्यंतच्या बाजार समितीच्या सर्वांगीण प्रगतीत राजकीय नेतृत्वाचे योगदान महत्वपूर्ण आहे. कार्यक्षेत्रातील बाजारसमितीवर प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळालेल्या कार्यकर्त्यांनी शेतकरी हित व व्यापारपेठेच्या वाढीसाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केले असून त्यांच्या ज्ञानाचा व नेतृत्वाचा बाजारपेठेस फायदा झाला आहे.

# संदर्भसूची


१) ए.पी.मगर - "अैन उमेदीत आम्ही"-रौप्य महोत्सव ग्रंथ- कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर-१९७०-पृष्ठ क्रमांक ३५

२) ए.पी.मगर-तत्रैव-पृष्ठ क्रमांक ३६

३) दैनिक पुढारी-कोल्हापूर-दिनांक ३०.०५.१९६१

४) दैनिक पुढारी-कोल्हापूर-दिनांक ३१.०५.१९६१

५) दैनिक पुढारी-कोल्हापूर-दिनांक २७.०८.१९७४

६) दैनिक पुढारी-कोल्हापूर-दिनांक १९.०१.१९८४

७) दैनिक सकाळ-कोल्हापूर-दिनांक २४.०३.१९८६

८) दैनिक सकाळ-कोल्हापूर-दिनांक २८.०३.१९८६

९) दैनिक सकाळ-कोल्हापूर-दिनांक०७.१२.१९९१

१०) दैनिक सकाळ-कोल्हापूर-दिनांक १०.०२.१९९६

११) दैनिक सकाळ-कोल्हापूर-दिनांक ०२.०१.१९९७

१२) दैनिक सकाळ-कोल्हापूर-दिनांक ०२.०१.१९९७

१३) दैनिक सकाळ-कोल्हापूर-दिनांक ०५.०१.१९९७

१४) दैनिक सकाळ-कोल्हापूर-दिनांक ०१.०४.२००२

१५) दैनिक सकाळ-कोल्हापूर-दिनांक ०२.०४.२००२

१६) दैनिक सकाळ-कोल्हापूर-दिनांक २४.०४.२००२

१७) दैनिक तरुण भारत-कोल्हापूर-दिनांक २४.०१.२००४

१८) ए.पी.मगर-तत्रैव-पृष्ठ क्रमांक ३५

१९) ए.पी.मगर-तत्रैव-पृष्ठ क्रमांक ३६

२०) वार्षिक अहवाल-कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर-सन १९६८-६९

२१) सर्वसाधारण माहीतीचा अहवाल-कोल्हापूर शेती उत्पन्न बाजार समिती, कोल्हापूर.